**MHNS140004852023**

नियमित फौज.खटला क्र.५४/२०२३
सरकार वि. सोन्या उर्फ प्रथमेश
(अर्जदार - विशाल आनंद चव्हाण)

## नि.क्र.१५ खालील आदेश

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज पोलीस ठाणे, वणी यांनी गु.र.क्र.२९४/२०२२ मध्ये जप्त केलेली बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटर सायकल जिचा नोंदणी क्र. एम.एच.-०५-सी.एस.-५६६४ चेसीस क्र. एमडी२ए१५बीझेड५एफडब्ल्युजी२१३९२ व इंजिन क्र. जेझेडझेडडब्ल्युएफजीओ१८६४ (यापुढे सोईकरिता 'जप्त वाहन' असा उल्लेख) चा अंतरिम ताबा मिळावा याकरिता फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४५१ नुसार दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदाराचे असे कथन आहे की, प्रस्तुत जप्त मोटर सायकली ही त्याच्या मालकीचे आहे. पोलीसांनी प्रस्तुत वाहन जप्त केल्यापासून ते पोलीस ठाण्याच्या आवारात उभे आहे त्यामुळे त्याचे नुकसान होण्याचा संभव आहे. अर्जदारास त्याचे दैनंदीन कामासाठी सदर वाहनाची अत्यंत आवश्यकता आहे. सबब, सदर वाहनाचा अंतरिम ताबा मिळणेकरिता आदेश व्हावेत अशी विनंती अर्जदाराने केलेली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे पाहिले. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे लेखी म्हणण्यात आरोपींना जप्त वाहन दिल्यास आरोपी पुन्हा अशाच प्रकारच्या गुन्ह्यात त्याचा वापर करतील तसेच जप्त वाहन ति-हाईत व्यक्तिंना विकतील असे म्हणणे सादर करुन अर्ज मंजुर करण्यास हरकत घेवुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०५.** अर्जदाराच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराने त्यांच्या कथनाच्या

पुष्ठर्थ त्याचे स्वतःचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.१६), नि.क्र.१८ लगत सदर वाहनाचे आर.सी. बुकची साक्षांकित प्रत व अर्जदाराचे आधारकार्डची साक्षांकित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केले आहेत. सदर दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, अर्जदाराचे नावे प्रस्तुत जप्त वाहन नोंदणीकृत आहे. तीच्या व्यतिरिक्त इतर कोणीही व्यक्ती सदर वाहनावर हक्क सांगत नाही.

**०६.** उपरोक्त संदर्भीय न्यायनिर्णयाचा आधार घेता आणि मा. सर्वोच्च न्यायालयाने *Syed Hafeezulla Pasha v/s State of Karnataka 1987 CrLJ 868 (Kant.), Palaniswami.S. v/s Arunagirinathan, 1998 Mad LW (Crl) 102 आणि* Sundarlal Ambalal Desai versus State of Gujarat (AIR 2003 S C 628), मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रस्तुत अर्जदार हा सदर जप्त वाहनाचा ताबा मिळण्यास पात्र आहे, त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही सदर वाहनावर हक्क सांगणारी व्यक्ती समोर आली नाही. सबब प्रस्तुत अंतरिम ताबा मिळण्यास अर्जदार पात्र ठरतो. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. पोलीस ठाणे वणी यांनी गु.र.क्र.२९४/२०२२ मध्ये जप्त केलेली बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटर सायकल जिचा नोंदणी क्र. एम.एच.-०५-सी.एस.-५६६४ चेसीस क्र. एमडी२ए१५बीझेड५एफडब्ल्युजी२१३९२ व इंजिन क्र. जेझेडझेडडब्ल्युएफजीओ१८६४ चा अंतरिम ताबा अर्जदारास द्यावा. त्याकरिता अर्जदाराने रुपये ५०० च्या मुद्रांक शुल्कावर १५,०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) रुपये किमतीचा इंडेमनिटी बॉण्ड भरुन दयावा.

३. प्रस्तुत गुन्हयाचे तपासी अंमलदार यांना असे आदेश देण्यात येतात की, सदर मुद्देमाल अर्जदाराच्या ताब्यात देताना त्याची छायाचित्रे आणि पंचनामा तयार करावा आणि ती प्रस्तुत खटल्यात दाखल करावीत.

४. अर्जदारास असेही आदेशीत करण्यात येते की, प्रस्तुत खटल्याचा निकाल

होईपावेतो अर्जदाराने सदर वाहन कोणासही दान, गहाण, विक्री देवु नये किंवा नष्ट करुन नये आणि इतर कोणत्याही स्वरुपात बदल होईल अशी कोणतीही कृती या न्यायालयाच्या पुर्व परवानगीशिवाय करु नये.

५. संबंधीतांना सदर आदेशाबाबतचे पत्र अग्रेषीत करण्यात यावे.

SHRUTI CHANDRAKANT NIRMALE

Digitally signed by SHRUTI CHANDRAKANT NIRMALE
Date: 2025.11.14 17:20:06 +0530

दिनांक १४/११/२०२५

( एस. सी. निर्मळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
दिंडोरी.